294



क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक १२/०३/२०२४

संदर्भ :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.निमत्ता-०५१९/८४८/प्र.क्र.८०/विशा-१अ, दिनांक ११ मार्च, २०२४.

विषय :- लोकसभा सार्वत्रिक निवडणुका २०१९ च्या कामासाठी नियुक्त केलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार मुळ वेतनाच्या फरकाची रक्कम रू.४५,४३,९२९/- अदा करण्यास मान्यता देण्याबाबत.

******

परिपत्रक -

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. निमत्ता-०५१९/८४८/प्र.क्र.८०/विशा-१अ, दिनांक ११ मार्च, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०३१११२४२०१२९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई (सस्नेह)
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक- २१

प्रत,

अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक,( कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये “ वित्त व लेखा “ या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

लोकसभा सार्वत्रिक निवडणुका २०१९ च्या कामासाठी नियुक्त केलेल्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सहाव्या व सातव्या वेतन आयोगानुसार मूळ वेतनाच्या फरकाची रक्कम रू.४५,४३,९२९/- अदा करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक: निमत्ता-०५१९/८४८/प्र.क्र.८०/विशा-१ अ
मंत्रालय (मुख्य इमारत), दुसरा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ११ मार्च, २०२४.

संदर्भ :- १) गृह विभाग, शासन समक्रमांक दि.०५.०४.२०२१,
२) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/२१/७२७२/ विधानसभा निवडणुक/२२८/२०१९, दिनांक १९.०५.२०२२ व २२.१२.२०२३.

प्रस्तावना:-

लोकसभा सार्वत्रिक निवडणुका-२०१९ च्या कामकाजाकरीता ३० दिवस अथवा ३० दिवसांपेक्षा जास्त पूर्णवेळ प्रत्यक्ष नियुक्त केलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगानुसार एक महिन्याच्या मुळ वेतनाएवढी रक्कम पारिश्रमिक मानधन देण्याबाबत दिनांक ०५ एप्रिल, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार घटक प्रमुखांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार बहुतांशी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे एक महिन्याचे मुळ वेतन म्हणून पारिश्रमिक मानधन अदा करण्यात आले असल्याने त्यांना देय होत असलेल्या सातव्या वेतन आयोगाप्रमाणे मुळ वेतनाच्या फरकाची रक्कम रु.४५,४३,९२९/- इतक्या खर्चास मान्यता देण्याचे शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:-

लोकसभा सार्वत्रिक निवडणुका-२०१९ च्या कामकाजाकरीता ३० दिवस अथवा ३० दिवसांपेक्षा जास्त पूर्णवेळ प्रत्यक्ष नियुक्त केलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना ७ व्या वेतन आयोगानुसार एक महिन्याच्या मुळ वेतनाएवढी रक्कम पारिश्रमिक मानधन देण्याबाबत दिनांक ०५ एप्रिल, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये आदेशित करण्यात आलेले आहे. त्यानुसार घटक प्रमुखांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार बहुतांशी पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे एक महिन्याचे मुळ वेतन म्हणून पारिश्रमिक मानधन अदा करण्यात आले असल्याने त्यांना देय होत असलेल्या सातव्या वेतन आयोगाप्रमाणे मुळ वेतनाच्या फरकाची रक्कम रुपये ४५,४३,९२९/- (अक्षरी रुपये पंचेचाळीस लाख त्रेचाळीस हजार नऊशे एकोणतीस फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

सदर मानधन हे एका अधिका-यास / कर्मचा-यास एकदाच देय होईल. तसेच, सदर अधिकारी व कर्मचारी यांना फरकाची रक्कम अदा करताना दुबार रक्कम अदा होणार नाही, याची विभाग प्रमुखांना दक्षता घ्यावी.

Scanned with CamScanner

२. पोलीस महासंचालक यांच्या अखत्यारीतील घटक कार्यालयातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे पारिश्रमिक/मानधन यावर होणारा खर्च (१) "मागणी क्र.बी-१, २०५५ पोलीस,(००) १०९ जिल्हा पोलीस, (००)(०१) जिल्हा पोलीस बल, दत्तमत (२०५५ ०१६८) (०१) वेतन" या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२०२४ या वित्तिय वर्षातील उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.७०/२०२४/व्यय-७, दिनांक १६.०२.२०२४ अन्वये त्या विभागांच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०३१११२४२०१२९२९ असा असून डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

JAHANGIR KYAMUDDIN KHAN

Digitally signed by JAHANGIR KYAMUDDIN KHAN
Date: 2024.03.11 12:51:23 +05'30'

(जहांगीर के.खान)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहायक, मुंबई
४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५. प्रधान सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी, मंत्रालय, मुंबई
६. पोलीस आयुक्त, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परिक्षा, महाराष्ट्र-१, मुंबई
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परिक्षा, महाराष्ट्र-२, नागपूर
९. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग यांचे स्वीय सहायक
१०. संचालक,नागरी संरक्षण संचालनालय, मुंबई
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/बांद्रा
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३. वित्त विभाग, व्यय-४ / व्यय-७, मंत्रालय, मुंबई
१४. सामान्य प्रशासन विभाग, कार्या.३३ व का.२१ (रोखशाखा) मंत्रालय, मुंबई-३२
१५. निवडनस्ती (कार्यासन विशा-१ अ)



Scanned with CamScanner